आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

११ जुलै २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- संसद आणि विधीमंडळात सर्वपक्षीय सदस्यांनी मैत्रीपूर्ण संवाद ठेवण्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं आवाहन /महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करताना महाराष्ट्राच्या योगदानाची प्रशंसा
- आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत मतं आणि सूचना जाणून घेण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी साधला अर्थतज्ज्ञांशी संवाद
- नीट यूजी परीक्षा पेपर फुटीप्रकरणी आतापर्यंत झालेल्या तपासाचा अहवाल सीबीआयकडून सर्वोच्च न्यायालयाला सादर /पुढची सुनावणी १८ जुलैला
- बिमस्टेक देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची दुसरी परिषद नवी दिल्लीत सुरू

**आणि**

- महाराष्ट्र विधान परिषदेच्या अकरा जागांसाठी उद्या मतदान

<><><><><>

संसदेत आणि विधीमंडळात सर्व पक्षीयांमध्ये संवादाची गरज आहे. सर्वांनी परस्परांमध्ये मैत्रीपूर्ण आणि सहकार्यात्मक संवाद ठेवावा असं आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज केलं. ते आज मुंबईत विधानभवनात राज्य विधीमंडळाच्या सदस्यांना संबोधित करत होते. सर्वांनी आत्मपरीक्षण करावं, सत्ताधारी आणि विरोधक एकत्र आले तरच जनतेच्या समस्या सोडवू शकतात. त्यामुळे लोकांच्या भल्यासाठी काम करा असं आवाहन त्यांनी केलं.

संसद आणि विधीमंडळाचं कामकाज ज्या पद्धतीने सुरू आहे त्याबद्दल त्यांनी स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली. गदारोळ घालण्याच्या प्रयत्नांना अजिबात प्रोत्साहन देऊ नका, शिस्तीचं पालन करणाऱ्यांना अधिकाधिक संधी द्या असं आवाहन त्यांनी सर्व राजकीय पक्षांना केलं. लोकशाहीत संवादाला महत्त्व आहे. पण

आजकाल समोरच्या पक्षाची बाजू ऐकून न घेण्याची नवीन पद्धत रुजू झाली आहे. लोकशाहीत याला अजिबात स्थान नाही, विरोधात असलं तरी समोरची बाजू समजून घेण्याचं आवाहन त्यांनी सर्व सदस्यांना केलं.

लोकशाहीच्या या तिन्ही स्तंभांचे अधिकार आणि कर्तव्य योग्यरित्या वाटून दिलेले आहेत. या तिन्ही स्तंभांना स्वतःच्या जबाबदारीचं पालन योग्यरितीनं करण्याचं आवाहन त्यांनी केलं. लोकशाहीच्या तिन्ही स्तंभांनी परस्परांमध्ये संवाद ठेवावा आणि समन्वयानं काम करावं असं आवाहन उपराष्ट्रपती धनखड यांनी केलं. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यपद्धतीचा दाखला उपस्थितांना दिला. महाराष्ट्र हे देशाचं 'पावर हाऊस' असून देशाला नवीन उंचीवर नेण्यासाठी भक्कम योगदान देत असल्याचे प्रशंसोद्गार त्यांनी काढले.

महिला, युवा, पर्यावरण बदल यासह जनतेच्या विविध प्रश्नांना कामकाजात प्राधान्य देण्याचं आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी यावेळी बोलताना केलं. तर भारतीय लोकशाही बळकट करण्याची भूमिका उपराष्ट्रपतींनी नेहमीच घेतली आहे. देशाला पुढे घेऊन जाण्यासाठी आणि लोकशाहीला समृद्ध करण्यासाठी, प्रतिष्ठा वाढवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. लोकशाहीला बळकट आणि लोकशाहीच्या तत्त्वांना पुढे घेऊन जाण्यासाठी उपराष्ट्रपतींची उपस्थिती महत्त्वाची असल्याचं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले. उपराष्ट्रपतींनी केलेलं मार्गदर्शन हे भविष्यात कामकाज करायला उपयुक्त ठरेल असं उपसभापती नीलम गोऱ्हे समारोप करताना म्हणाल्या.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत देशातल्या नामांकित अर्थतज्ज्ञांशी संवाद साधला आणि आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाबाबतची त्यांची मतं आणि सूचना जाणून घेतल्या. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी आणि इतर सदस्य या बैठकीला उपस्थित होते.

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या २२ तारखेपासून सुरु होणार असून २३ तारखेला केंद्रीय अर्थसंकल्प मांडला जाणार आहे.

<><><><><>

गोरेगाव मुलुंड जोडरस्ता प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यातल्या जुळा बोगदा कामाचं भूमिपूजन १३ जुलै रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. १२ पूर्णांक २ दशांश किलोमीटर लांबीचा गोरेगाव-मुलुंड जोड रस्ता हा मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा प्रकल्प आहे.

<><><><><>

नीट यूजी परीक्षा पेपर फुटी प्रकरणी आतापर्यंत झालेल्या तपासाचा अहवाल आज सीबीआयनं सील बंद लिफाफ्यात न्यायालयासमोर सादर केला. सर्वोच्च न्यायालयानं सीबीआयला आतापर्यंत झालेल्या तपासाची माहिती देण्याची सूचना ८ जुलै रोजी दिली होती. या प्रकरणाची पुढील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात १८ जुलै रोजी होणार आहे. या परीक्षेच्या पेपरसेंटिंगची आणि पेपर फुटीची प्रक्रिया पूर्ण समजून घेण्याची गरज आहे, तसंच या परीक्षेच्या विश्वासार्हतेशी तडजोड झाली असल्याचं, मत सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठानं व्यक्त केलं आहे.

<><><><><>

जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त कुटुंब नियोजन आणि लोकसंख्या नियंत्रण या विषयावर आज केंद्रीय आरोग्यमंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली आभासी बैठक झाली. माता आणि बालकांच्या आरोग्यासाठी गर्भधारणेत योग्य अंतर आणि आरोग्यपूर्ण कालावधी ही या बैठकीची संकल्पना होती. या कार्यक्रमात नड्डा यांनी कुटुंब नियोजनाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी 'सुगम' या बहुउद्देशीय प्रदर्शन मॉडेलचं अनावरण केलं. यावेळी रेडिओ संदेश आणि जिंगल्स

देखील प्रसिद्ध करण्यात आल्या. कुटुंब नियोजना बाबत जागरूकता वाढवणं आणि कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर वाढावा, यासाठी सर्व राज्यांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी एकत्रितपणे काम केलं पाहिजे, असं नड्डा यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

नवी दिल्लीत आजपासून बिमस्टेक देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची दुसरी परिषद सुरू झाली आहे. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर असून त्यांनी उपस्थित समपदस्थांचं स्वागत केलं. त्यांनी आपल्या उद्घाटन भाषणात बिमस्टेक सहकार्यामध्ये नवीन ऊर्जा, संसाधनं आणि वचनबद्धता वाढवण्यासाठी ही चर्चा उपयुक्त ठरेल असं सांगितलं. तसंच या परिषदेच्या सत्रात कनेक्टिविटी, व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, आरोग्य आणि अंतराळ क्षेत्रातील सहयोग, डिजीटल, सार्वजनिक पायाभूत सुविधा, क्षमता तसंच यंत्रणेच्या गुणवत्तेवर चर्चा होणार आहे.

यावेळी जयशंकर यांनी उपस्थित देशांच्या परराष्ट्रमंत्र्याची भेट घेऊन त्यांच्यासोबत बिमस्टेक देशांच्या सहकार्याबाबत सविस्तर चर्चा केली.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या अकरा जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. विधानसभेचे सदस्य या निवडणुकीत मतदान करणार आहेत. उद्या सकाळी ९ वाजता मतदानाची प्रक्रिया सुरू होईल, आणि त्याच दिवशी संध्याकाळी मतमोजणी होईल. अकरा जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत बारा उमेदवार रिंगणात आहेत.

भाजपाकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे निवडणूक लढवत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, तर शिवसेनेकडून कृपाल तुमाणे आणि भावना गवळी निवडणूक लढवत आहेत.

काँग्रेसच्या प्रज्ञा सातव, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मिलिंद नार्वेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाठिंब्यावर शेकापचे जयंत पाटील हे रिंगणात आहेत.

**<><><><><>**

**२०२५ सालापर्यंत** क्षयमुक्त भारत करण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून १८ वर्षांवरच्या सर्व व्यक्तींना क्षयरोग प्रतिबंधक लस देण्याची मोहीम राज्यात राबवण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी विधानसभेत दिली. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या रोगाच्या उच्चाटनासाठी काय काय करता येईल, याचा अभ्यास करण्यासाठी आरोग्य संचालकांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती नेमण्यात येईल असंही मंत्री म्हणाले.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील तर सरकारनं शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती देऊन त्यांचं थकित वीजबिल माफ करावं, अशी मागणी विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली.

राज्य सरकारने मुस्लिमांना आरक्षण द्यावं, अशी मागणी आमदार अबू आझमी यांनी आज विधानसभेत केली. यावर संविधानात धर्मावर आधारित आरक्षणाची तरतूद नाही, त्यामुळं मुस्लिमांमधल्या मागास जातींना आरक्षण दिली असल्याची प्रतिक्रिया कॅबिनेट मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. तर धनगरांना अनुसूचित जातींमध्ये आरक्षण द्यावं, अशी मागणी आमदार यशोमती ठाकूर यांनी केली.

**राज्यात अंगणवाडी** उभारणी, दुरुस्ती यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करण्यात येईल, अशी माहिती महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

**मुंबईच्या परळ** भागातल्या बी. आय. टी. चाळीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं भव्य स्मारक उभारण्यासाठी सरकारची भूमिका अतिशय सकारात्मक

आहे, अशी ग्वाही मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत दिली. याबाबतची समिती नेमून तिचा अहवाल आल्यानंतर पुढची कार्यवाही केली जाईल, असं ते म्हणाले.

**मुंबईतल्या रस्ते कॉँक्रिटीकरणाच्या** कामासंदर्भात चुकीची माहिती दिल्याचं सांगत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल परब यांनी मंत्री उदय सामंत यांच्याविरोधात हक्कभंगाची नोटीस, तालिका सभापतींना सादर केली.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज तराई जिल्ह्यातल्या श्रावस्ती आणि बलरामपूरमधल्या पूरग्रस्त भागांना भेट देऊन पूरग्रस्तांची चौकशी केली. तर सहारनपूर जिल्ह्यामध्ये बचाव आणि मदतकार्यासाठी लष्कराला पाचारण केलं आहे. गररा आणि खन्नौत नद्यांच्या प्रवाहात २६४ हून अधिकजणं अडकले असून १२ जिल्ह्यांतली ६३३ गावं पुराच्या तडाख्यात सापडली आहेत. तसंच हजारो एकर शेतजमीन पाण्याखाली गेली असून सुमारे ८ लाख लोक बाधित झाले आहेत.

**<><><><><>**

दोन महिला नक्षलवाद्यांनी आज गडचिरोली इथं आत्मसमर्पण केलं. त्यापैकी प्रमिला सुखराम बोगा उर्फ मंजूबाई हिच्यावर ४० गुन्हे दाखल असून तिच्यावर शासनाने ८ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. अखिरा संकेर पुडो उर्फ रत्नमाला या दुसऱ्या नक्षलवादी महिलेवर सात गुन्हे दाखल असून पोलिसांनी तिच्यावर आठ लाखांचं बक्षीस लावलं होतं.

**<><><><><>**

उद्यापासून १५ जुलैपर्यंत महाराष्ट्र आणि कर्नाटकात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार, तर ईशान्य भारतात पुढचे दोन दिवस तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. पश्चिम

बंगालचा हिमालयालगतचा भाग सिक्कीम, बिहार आणि अरुणाचल प्रदेशात उद्या तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस शक्यता आहे.

**//<><><><><>//**